# प्रेस नोट

## लातूर जिल्हा पोलीस शिपाई भरती सन २०२२-२०२३

## लेखी परीक्षा

दिनांक ०७.०७.२०२४

---

लातूर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस भरती सन २०२२-२०२३ च्या जाहिराती मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय पोलीस शिपाई यांची (३९), पोलीस शिपाई बॅण्डस्मन यांची (०५) व पोलीस शिपाई चालक यांची (२०) पदे भरण्यासाठी पहिल्या टप्यात उमेदवारांची "**शारिरिक मोजमाप व शारिरिक मैदानी चाचणी**" ही दिनांक १९.०६.२०२४ ते २८.०६.२०२४ या कालावधीत पोलीस मुख्यालय, बाभळगाव, लातूर या ठिकाणी घेण्यात आली आहे.

पोलीस शिपाई पदासाठीच्या शारिरिक मोजमाप व शारिरिक मैदानी चाचणीत उत्तीर्ण होवुन लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या १:१० उमेदवारांचे गुणांची गुणवत्ता यादी दि.२९.०६.२०२४ रोजी या कार्यालयाचे संकेतस्थळ **www.laturpolice.gov.in** वरती प्रसिद्ध करण्यात येवुन पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील दर्शनी भागावर डकविण्यात आली आहे. **पोलीस शिपाई पदासाठीच्या सदर गुणवत्ता यादीतील (२६५) उमेदवारांची लेखी परीक्षा हि दिनांक ०७.०७.२०२४ रोजी सकाळी ०९.०० वा. पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव, लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर लेखी चाचणीसाठी (२६५) पैकी (२६३) उमेदवार हे हजर राहिले असुन, (०२) उमेदवार हे लेखी चाचणीसाठी गैरहजर होते.**

दिनांक ०७.०७.२०२४ रोजी पोलीस शिपाई पदासाठीची घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेची **" तात्पुरती उत्तरतालिका (Provisional Answer Key)" ही दिनांक ०७.०७.२०२४ रोजी या कार्यालयाचे संकेतस्थळ www.laturpolice.gov.in** वरती प्रसिद्ध करण्यात येवुन, पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील बाहेरील दर्शनी भागावर डकविण्यात आली आहे. सदर नमुना उत्तरतालिके बाबत उमेदवारांचे काही आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे आक्षेप २४ तासाचे आत या कार्यालयाचे ई-मेल आयडी **sp.latur@mahapolice.gov.in** वरती तसेच **पोलीस नियंत्रण कक्ष, लातूर येथील दुरध्वनी क्रमांक ०२३८२-२४२२९६ वरती नोंदविण्यात यावेत.** यानंतरने प्राप्त झालेल्या आक्षेपांचा कसल्याही प्रकारचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(सोमय मुंडे)
पोलीस अधीक्षक, लातूर

**प्रति,**

**व्यवस्थापक,**
दैनिक .....................................................

**प्रत :- सहा.पोलीस निरीक्षक, सायबर सेल, लातूर**

२/- यांनी सदरची प्रेसनोट दि.०८.०६.२०२४ रोजीच्या लातूर जिल्हा पोलीस भरती-२०२२-२३ ची जाहिरात दिलेल्या स्थानिक वृत्तमान पत्रात प्रसिद्ध करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदरची प्रेसनोट, लेखी परीक्षेची " तात्पुरती उत्तरतालिका (*Provisional Answer Key*)" या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.